


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com


वर्ष २ रे | अंक : ६७५. वा | सोमवार | दि. ०५ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# बुलढाणा महसूल विभागात भ्रष्टाचाऱ्यांना चहूबाजूंनी मिळतेय अभय...

## तहसीलदार खंडारे यांची बदली, पोलिस तरी भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करणार का?

**जनसंचलन/बुलढाणा**

वाट्टेल तो भ्रष्टाचार करा, वाट्टेल तो नियमभंग करा, कशीही मनमानी करा, परंतु कोणावरही कारवाई होणार नाही, अशी हमीच जणू महसूल विभागातील अधिकाऱ्यांना मिळाली असल्या कारणाने बुलढाणा महसूल विभागात भ्रष्टाचाराची संधी संपता संपेना असे दिसते. एका ठिकाणी भ्रष्टाचार केला आणि तो उघडकीस आला की, त्या अधिकाऱ्याची बदली करून टाकायची म्हणजे सगळा मामला थंडबस्त्यात असा प्रकार सुरू आहे. महसूल विभागात हे सुरूच आहे, परंतु पोलिस खात्याकडूनही या भ्रष्टाचाऱ्यांवर कोणतीही कारवाई नाही.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन गेल्या अनेक महिन्यांपासून सातत्याने महसूल विभागात बोकाळलेला भ्रष्टाचार सातत्याने पुराव्यासह चव्हाट्यावर आणण्याचे काम करीत आहे. मात्र, महसूल विभागात कार्यरत राहून अनिर्बंध भ्रष्टाचार करणारे आणि या भ्रष्टाचाऱ्यांना अभय देणारे अधिकारी आता इतके निर्ढावले आणि इतके गेंड्याच्या कातडीचे बनले आहेत की, त्यांना कशाचाही फरक पडताना दिसून येत नाही. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन गेल्या अनेक दिवसांपासून महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रति सातत्याने अत्यंत तिखट भाषेत वार्तांकन करीत आहे. मात्र, निर्ढावलेले आणि निर्लज्ज बनलेले अधिकारी भ्रष्टाचारासंदर्भात कोणतीही कारवाई करण्यास तयार नाही. एकीकडे महसूल विभागातील सर्वाधिक भ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे हे भ्रष्टाचाराचा उच्छाद तर मांडत आहेतच, दुसरीकडे त्यांना साथ देण्याचे काम काही अधिकारी करीत आहेत. त्यापैकीच एक म्हणजे बुलढाण्याचे तहसीलदार रुपेश खंडारे हे आहेत. रुपेश खंडारे यांनी टेकाळे यांना साथ देण्यासाठी अत्यंत प्रच्छन्नपणे आपल्या अधिकारांचा गैरवापर केला. हा गैरवापर करताना तहसीलदार खंडारे यांना कोणतीही लाज-लज्जा किंवा शरम वाटली नाही. मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे व त्यांचे नातेवाईक ज्योती विजय टेकाळे, दीपक दत्तात्रय टेकाळे, राजू दत्तात्रय टेकाळे यांच्या नावे असलेली जांभरुन शिवारातील २.८२ हेक्टर आर शेतजमीनी संदर्भात केवळ सनद देण्याचा अधिकार असताना त्यांनी त्याही पुढे जाऊन चक्क अधिकाराचा गैरवापर करून त्यांना अकृषक करून देण्यासाठी उघडपणे मदत केली. या प्रकारातून तहसीलदार खंडारे यांनी उघडपणे नियमभंग केला. विशेष अशाप्रकारचा नियमभंग करणाऱ्या अनेक तहसीलदारांवर राज्यात विविध ठिकाणी कारवाया झाल्या आहेत. मात्र, बुलढाणा महसूल विभाग याला पूर्णतः अपवाद आहे. टेकाळे यांना राजकीय वरदहस्त असल्याने व जिल्ह्यातील लोकप्रतिनिधि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्या कारणाने टेकाळेंच्या सर्व पापांवर पांघरुण घातले जात आहे. त्यात तहसीलदार खंडारे हे हिरीरीने सहभागी आहेत. या प्रकरणी सातत्याने सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने उपविभागीय अधिकारी किंवा निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली. मात्र, सर्वच जण आपल्या तोंडावर पांघरुण घेऊन बसलेले असल्याने कुणाही अधिकाऱ्याला या भ्रष्टाचाराची काहीही काळजी नाही. कारवाई होत नसल्याचे पाहून सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने मग शहर पोलिस स्टेशनला या भ्रष्टाचारासंदर्भात तक्रार देण्यात आली. या तक्रारीवर आतापर्यंत काय कारवाई झाली, याचीही माहिती अद्याप बाहेर आलेली नाही. त्यात आता माहिती आली की, तहसीलदार खंडारे यांची बदली झालेली आहे. अशाप्रकारे महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी आणखी एक पळवाट शोधून काढली आहे. म्हणजे ना भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई, ना भ्रष्टाचाऱ्यांना साथ देणाऱ्यावर कारवाई नाही. या संपूर्ण स्थितीत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आपले सरकार स्वच्छ प्रशासन देत असल्याची बतावणी जाहीर सभांमधून करीत आहेत. मात्र, त्याच्याच अखत्यारित राज्यातील महसूल विभागात हा बोकाळलेला भ्रष्टाचार कसा दिसून येत नाही. खंडारे यांची बदली झाल्यामुळे पुन्हा हा संपूर्ण भ्रष्टाचार थंडबस्त्यात जाण्याची दाट शक्यता असल्याने महसूल विभागातील भ्रष्टाचाराला कधी अंत होणार आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. काहीही असले तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज मात्र यासंदर्भात जोपर्यंत दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई होत नाही, तोपर्यंत आम्ही आमची मोहीम काही केल्या बंद करणार नाही. महसूल विभागातील हा भ्रष्टाचार खणून काढणे हे आमचे अंतिम ध्येय असून, ज्यांनी-ज्यांनी भ्रष्टाचार केला आहे, त्या सर्वांवर कायदेशीर कारवाई झाल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही.




या महसूल भ्रष्टाचार प्रकरणात जो कोणी दोषीना वाचवण्याचा प्रयत्न करेल आम्ही त्या महाभ्रष्ट अधिकाऱ्याची माहिती खोलवर जाऊन पुराव्यासह प्रशासना समोर मांडून जो पर्यंत त्यांच्यावर कारवाईचा बडगा उचलल्या जात नाही आमचा हा पाठपुरावा असाच सुरू राहणार

अजून बरेच काही पुढील भागात...


## २ घरांवर चोरट्यांनी केला हात साफ...

**जनसंचलन/मेहकर**

स्थानिक लक्ष्मीनारायण नगर येथे आणि मेहकर पोलीस स्टेशन अंतर्गतच्या अंत्री देशमुख येथे चोरट्यांनी हात साफ करत सोन्याचे दागिने व मुद्देमाल लंपास केला आहे. याबाबत असे की, मेहकर येथील लक्ष्मीनारायण नगर येथील रहिवासी श्रीमती अश्विनी सतीश आव्हाळे वय २८ यांच्या लक्ष्मीनगर परिसरातील घरातून ४ फेब्रुवारीचे मध्यरात्री ०१:०० ते ०१:३० वा. दरम्यान अज्ञात तीन इसमांनी संगनमत करुन फिर्यादी व साक्षिदार यांचे घराचा दरवाजाचा कडी-कोंडा तोडून घरात प्रवेश करुन घरातील अलमारीतील सोन्या-चांदीचे दागिने किंमत ४४,६०० रुपये, ब्युटी पार्लरमधिल सामान किंमत ३००० रुपये व नगदी २१,००० रुपये असा एकूण ६९,१०० रुपयांचा माल चोरुन नेला. या प्रकरणाचा तपास - पोउपनि गणेश कड हे करत आहेत. तर तालुक्यातील अंत्री देशमुख येथे उत्तम पंडितराव नाईकवाडे हे एका कार्यक्रमाच्या निमित्ताने पती-पत्नी मेहकर येथे गेले असतांना कार्यक्रम आटोपून घरी परत आल्यावर घराचा दरवाजा व कुलूप तोडलेले दिसले. तसेच घरातील सोन्याची अंगठी व इतर सोन्याचे



दागिने असा ६० हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यानी लंपास केला. ही घटना ४ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ ते ५ च्या सुमारास घडली. या चोरीचा तपास ईश्वर सोनुने पोलीस हवालदार हे करत आहेत.



# हम नही सुधरेंगे नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि...

जनसंचलन/ नांदुरा

नांदुरा शहरातील वादग्रस्त ठरलेली नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव बँक मध्ये अजूनही नियमबाह्य कामे केली जात असून अनेक वेळा तक्रारी होऊन वर्तमानपत्रांमध्ये बातम्या प्रकाशित होऊन सुद्धा नांदुरा अर्बन बँकेत कुठल्याही प्रकारची सुधारणा झालेली दिसत नाही, बँकेचे अध्यक्ष चंपालाल झंवर हे अजूनही बँकेत केव्हा येतात हजर असतात याची माहिती सभासद ग्राहकांना देण्यात येत नाही, अध्यक्ष चंपालाल झंवर यांची अध्यक्षपदाची कारकीर्द वादग्रस्त ठरली असून कुठल्याही प्रकारचे अध्यक्षपदाचे गटस निर्णयक्षमता त्यांच्यात नसल्याचे अनेक संचालक बोलत असतात, केवळ काही दोन तीन संचालकांना व एका संचालकानी अध्यक्षांची चांगली कानउघडणी केल्यामुळे त्यांनाच फक्त अध्यक्ष बँकेत केव्हा येणार याची माहिती असल्याचे समजते, फक्त पद अडवून बसले व आपल्या लेटरहेडवर अध्यक्ष हे बिरूद लावून वावरणाऱ्या अध्यक्ष चंपालाल झंवर यांनी बँके करीता वेळ द्यावा अध्यक्षपदाची गरीमा मान सन्मान जो असतो त्याला गालबोट लावू नये अशी अपेक्षा सभासद करीत असून त्यांना वेळ नसल्यास पद न अडविता राजीनामा देऊन मोकळे व्हावे म्हणजे उंटावरून शेळ्या हाकणारा अशातला प्रकार बंद होईल व त्यांचे दोष जाहीरपणे सांगितल्यामुळे बातम्या प्रकाशित झाल्यामुळे अध्यक्ष चंपालाल झंवर यांना जो राग अनावर झाला, व त्यांचे पर्यावसान वृत्तपत्राला अब्रू नुकसानीच्या नोटिसेस देऊन खिसियांनी बिल्ली खांबां नोचे असा प्रकार न करता बँकेत येऊन सभासद ग्राहक ठेवीदार यांच्या तक्रारी अडचणी सोडविल्यास बरे होईल, नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव बँकेत मागील वर्षी संचालकांनी राजीनामा दिल्यानंतर तत्कालीन अध्यक्षांनी निलंबित केलेला मुख्य कार्यकारी अधिकारी पांडेंनी बँकेच्या सभागृहात पत्रकार परिषद त्या राजीनामा दिलेल्या संचालकांना घेऊ दिल्यामुळे दुसऱ्या दिवसापासून बँकेच्या ठेवी झपाट्याने विड्रॉल झाल्या होत्या, त्यांचा परिणाम होऊन बँकेला गुंतवणूक केलेल्या निधी विड्रॉल केल्यामुळे १ कोटी २७ लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याचे अहवालात सिद्ध झाले आहे, नुकसानीस तत्कालीन अध्यक्षांनी निलंबित केलेला मुख्य कार्यकारी अधिकारी पांडे व राजीनामा दिलेले संचालक जबाबदार असून त्यांच्याकडून सदर रक्कम वसुलीसाठी सध्याचे अध्यक्ष चंपालाल झंवर व संचालक मंडळांनी कार्यवाही करावी अशी मागणी सर्व सभासद करीत आहेत, अध्यक्ष व संचालक मंडळ वसुलीसाठी कुचराई करीत असल्यास सहकार खात्याने संबंधित संचालक मंडळ बरखास्त करून त्यांचे कडून रक्कम वसूल करावी, म्हणजे सहकार खात्याच्या वचक अशा गैरप्रकार करणाऱ्या लोकांवर राहील व ठेवीदारांचे पैशाचा अशा प्रकारे दुरुपयोग होणार नाही, यासंबंधी नवीन संचालक मंडळ काय निर्णय घेते की घेणार नाही हे सभासद ग्राहक ठेवीदारांना समजले पाहिजे अशी रास्त मागणी सभासदांची आहे, नांदुरा अर्बन बँकेत अनेक प्रकारे सभासद ग्राहकांना त्रास होतो त्या संदर्भात बँकेने काय निर्णय घेतले आहेत, त्यांची माहिती सुद्धा देण्यात आलेली नाही, आवक जावक मध्ये सभासद तक्रार कर्ते त्यांचे अर्ज कुठल्याही अडथळा न करता देण्यात यावे, व त्यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करून द्यावी, म्हणजे खऱ्या अर्थाने पारदर्शकपणा बँकेत आहे व बँक काहीही गैरप्रकार करीत नाही आप-ोआप सिद्ध होईल, त्यामुळे तक्रार कर्ते त्यांचे प्रश्न मार्गी लागतील तेव्हा वर्तमानपत्रा बातमी कशी काय प्रकाशित होईल ? इतकी साधी गोष्टी या अध्यक्षाला समजत नाही काय ? विनाकारण आपली कोणी तक्रार केली म्हणून त्यांचे विरुद्ध बँकेच्या पैशाचा दुरुपयोग करू नये अशी सभासदांची मागणी आहे, आणि जर तुमची बदनामी पेपर मध्ये बातमी प्रकाशित झाली म्हणून तुम्ही एखाद्या वृत्तपत्राला नोटीस देऊन कारवाई करता तर इतर अनेक वृत्तपत्रात बँकेच्या विरुद्ध बातम्या प्रकाशित झाले आहेत, त्या वृत्तपत्रातील बातम्या मुळे बँकेची बदनामी झाली नाही काय ? की त्या वृत्तपत्रांना तुम्ही घाबरता आहात ? बँकेच्या गैर कारभाराविरुद्ध तक्रारी ह्या चालूच राहतील, गैरप्रकार होतात व बातम्या प्रकाशित होतात म्हणून तक्रारी होत असतात, तेव्हा गैरप्रकार होणार नाही करणार नाही असे ठरविले तर बाकीचे प्रकरणे होणार नाहीत, उलटपक्षीबँकेच्यापैशाचादुरुपयोगकरूनबँकेच्यापैशानेआपल्यास्वार्थासाठी आपल्या चुका लपविण्यासाठी व तक्रार कर्त्यावर दबाव आणण्याच्या उद्देशाने आपण कारवाई करत आहे हे सिद्ध होत आहे एवढे मात्र खरे.




**नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव बँकेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार सुरू असल्यामुळे अनेक तक्रारी व कोर्टात सभासदांनी बँकेविरुद्ध प्रकरणे दाखल केलेले आहेत, बँकेची वृत्तपत्रात बातमी प्रकाशीत झाली ही बातमी तत्कालीन अध्यक्षांनी निलंबित केलेला मुख्य कार्यकारी अधिकारी पांडेला एका सभासदांनी पीडीएफ फाईल पाठविताच पांडेचा पारा भडकला व बातमी मला का पाठवली म्हणून सभासदाशी वाद घालू लागला व माझ्या नांदी लागू नका मी तुम्हाला कोर्टात खेचेन? अशी अहंकाराची भाषा वापरली सभासदाशी आणि तुम्हाला पाहून घेईल वगैरे वगैरे म्हणून पांडेचे संतुलन बिघडले त्या सभासदांनी देखील कोंबडे झाकून ठेवल्याने दिवस उगायचा थांबत नाही असे उत्तर देऊन पांडेला चांगलीच खरी खरी सुनावुन निरुत्तर केले,**

# चारचाकीतून पशूधन पळवणाऱ्यांनी दोघांना उडवल

## खामगावातील घटना चोरीच्या घटनांमुळे भितीचे वातावरण

जनसंचलन/ खामगाव



शहरातील विविध भागांतून गेल्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणात गायींची चोरी होत असल्याचे प्रकार घडत आहे. त्यावर पाळत ठेवून गाय चोरी रोखण्यासाठी पुढे आलेल्या दोघांना चारचाकीने उडवून जखमी केल्याची घटना शनिवारी (दि. ३) पहाटे २.४५ वाजता घाटपुरी नाका परिसरात घडली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांत अज्ञात चार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी ऋषिकेश दिलीप डवंगे (२३) यांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून शहरातून गायींची चोरी होत असल्याच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे राष्ट्रीय गो-सेवा संघाच्या माध्यमातून हा प्रकार रोखण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. गोसेवा संघाचे सदस्य रात्री शहरात गस्त घालत असतात. त्यानुसार शनिवारी रात्री घाटपुरी परिसरात पांढऱ्या रंगाची चारचाकी गाडी संशगामातरीत्या फिरत असल्याने आढळून आले. त्या गाडीचा शोध घेण्यासाठी विशाल बारकिया, अभिषेक रत्नपारखी, गजानन लाड यांच्यासोबत घेतली. त्यांनी धाव त्यावेळी करवीर कॉलनीतील शिवमंदिराजवळ ३० ते ३५ वयोगटातील चार युवक गायीला घाईघाईने गाडीत टाकून बसत असल्याचे दिसले. त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी वाहनाचा वेग वाढवला. तसेच त्यांच्यासह मित्र बारकिया यांना धडक दिली. चालकाजवळ बसलेल्याने अज्ञाताने आता फक्त वाहनाची धडक दिली. पुढच्या वेळी जिवाने मारण्याची धमकी दिल्याचे म्हटले. त्या धडकेत दोघेही जखमी झाले. यावेळी आरडाओरडीने नागरिक जमा झाले. परिसरातील अजित बेगानी यांनी त्यांच्या गायीचे वर्णन सांगितले. त्यांनी घरासमोर मोकळ्या जागेत गाय बांधलेली होती, त्या गायीची चोरी झाल्याचे त्यांनी सांगितले. जखमींवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत

# मालवाहू वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार...

जनसंचलन/ देऊळगाव राजा

भरधाव मालवाहू वाहनाने दुचाकीस धडक दिल्याने एक जण जागीच ठार झाल्याची घटना जालना चिखली रोडवरील दगडवाडी फाट्याजवळ २ फेब्रुवारी रोजी रात्री घडली. याप्रकरणी देऊळगाव राजा पोलिस स्टेशनला मालवाहू वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. गौतम पुंडलिक पैठणे, रा. काटोडा असे मृताचे नाव आहे. चिखली तालुक्यातील काटोडा येथील गौतम पुंडलिक पैठणे हे देऊळगाव राजा येथून त्यांच्या गावी त्यांच्या दुचाकी क्रमांक एमएच ०४ - डीझेड ७५९१ ने जात होते. याव-ेळी दगडवाडी फाट्याजवळ समोरून भरधाव येत असलेल्या मालवाहू वाहन क्रमांक एमएच २८ बीबी ०७६१ ने त्यांच्या दुचाकीस जबर धडक दिली.




घटनेची माहिती मिळताच डॉ. अक्षय गुट्टे हे ॲम्बुलन्ससह घटनास्थळावर पोहोचले. परंतु, धडक गंभीर असल्यामुळे पैठणे यांचा जागीच मृत्यू झाला आहे. याप्रकरणी संदीप देवबा पैठणे, रा. काठोडा पोस्ट गांगलगाव तालुका चिखली यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वाहनचालकाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा अधिक तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल विश्वनाथ काकड करीत आहेत.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# बालकांची शैक्षणिक सुरुवात अंगणवाडीतूनच...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

सिंदखेडराजा तालुक्यातील तांदुळवाडी येथील मिनी अंगणवाडी केंद्रामध्ये पालक निळायचे आयोजन तीन फेब्रुवारीला करण्यात आले होते, यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सरपंच शशिकला भोसले, उपसरपंच शिवगंगा जायभाये, ग्रामपंचायत सदस्य संध्या कायंदे, शिवराज कायंदे, सचिव विनोद सातपुते उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तदनंतर सचिव विनोद सातपुते यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की बालकांच्या शैक्षणिक विकासाची खरी सुरुवात अंगणवाडी मधूनच होते, म्हणून खऱ्या अर्थाने अंगणवाडी शिवीकेजी खूप मोठी योगदान असून प्रत्येक पालकाने आपल्या बालकाला नेहमी धनगरवाडी मध्ये पाठवावे म्हणजे त्यांचा शैक्षणिक पाया मजबूत होईल, तसेच शिवराज गांधी यांनी सुद्धा व्यक्त विचार करून अंगणवाडीला सर्व मदत करण्यास आम्ही सदैव तयार आहोत असे सांगितले. यावेळी अंगणवाडीला ग्रामपंचायत कडून स्वयंपाकाचे साहित्य देण्यात आले. तर प्राध्यापक धनश्री कायंदे यांच्याकडून महापुरुषांच्या प्रतिमा सप्रेम भेट देण्यात आल्या



कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी प्रकाश खरात यांनी केले तर आभार प्रदर्शन अंगणवाडी सेविका प्रिया खरात यांनी केले यावेळी कार्यक्रमाला सिताराम जाधव, विजय काळे, राजू खरात, शिवाजी खरात, राहुल खरात, वैभव खरात, हरिभाऊ जायभाये, राजू कायंदे हजर होते

# विवाहितेवर अत्याचार करत मुलीचाही केला विनयभंग...

**जनसंचलन/ खामगाव**



विवाहितेवर बळजबरीने अत्याचार करून तिच्या १० वर्षीय मुलीचा विनयभंग करण्यात आला. ही घटना खामगाव शहरातील एका वस्तीत घडली. या घटनेमुळे खामगावात एकच खळबळ उडाली असून पोलिसांनी तक्रारीवरून आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला. तक्रारीनुसार, खामगाव शहरापासून जवळच असलेल्या वस्तीत वास्तव्यास असलेल्या महिलेवर एका ३७ वर्षीय इसमाने बळजबरीने अत्याचार केल्याचे म्हटले. १० जानेवारी ते ११ जानेवारी दरम्यान ही घटना घडली. घटनेनंतर विवाहिता तक्रार देण्यासाठी जात असताना आरोपीने तिच्यावर दबाव आणला. तसेच तिच्या दहा वर्षांच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग करीत दहशत निर्माण केल्याचा आरोप पीडितेने तक्रारीत केला. बदनामीच्या भीतीने विलंबाने तक्रार दाखल केल्याचेही तक्रारीत नमूद केले.

# विवाहित महिलेचा सासरच्या मंडळीने केला शारीरिक व मानसिक छळ



**जनसंचलन/ डोणगाव**

डोणगाव येथून जवळच असलेल्या कनका येथील विवाहितेचा भौतिक सुखाच्या वस्तू खरेदी करण्यासाठी शारीरिक व मानसिक छळ करण्यात आल्याचा आरोप करीत पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून सासरच्या ९ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या कनका येथील श्रुती अंकुश गिरे हिचा विवाह रामनगर रिसोड येथील अंकुश विठ्ठल गिरे याच्यासोबत ३ जुलै २०२० रोजी झाला. लग्नानंतर विवाहिता सासरी गेली. सुरुवातीचे काही दिवस चांगले नांदविल्यानंतर सासरच्यांनी मोटारसायकलसाठी छळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे. विवाहितेच्या वडिलांनी मोटारसायकल घेऊन दिली. मात्र, त्यानंतरही विवाहितेचा छळ थांबला नसल्याचे तक्रारीत नमूद आहे. याउलट नंतर कार आणि घर घेण्यासाठी विवाहितेला सासरच्यांनी त्रास दिला. सासरच्या मंडळींचा त्रास कमी व्हावा, यासाठी विवाहितेच्या वडिलांनी घराचा हप्ता भरण्यासाठी शेत विकून सुरुवातीला ४० लाख आणि त्यानंतर २० लाख रुपये दिल्याचा आरोप तक्रारीत केला. कार घेण्यासाठी ५ लाख रूपये न दिल्याने मारहाण करून छळ करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद केले. या तक्रारीवरून पोलिसांनी पती अंकुश विठ्ठल गिरे, विठ्ठल किसन गिरे, लता विठ्ठल गिरे, राणी मनोज गिरे (सर्व रा. रामनगर रिसोड, जि. वाशिम), नामदेव किसन गिरे, प्रकाश किसन गिरे, गणेश प्रकाश गिरे, संतोष देवकर (रा. गोरेगाव, ता. शेनगाव, जि. हिंगोली) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. पुढील तपास ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली सफौ गणेश इव्हळे करीत आहेत.


# शासकीय अध्यापक महाविद्यालयाचे कु.दीक्षा जाधव यु.जी.सी. एन.इ.टी आणि महेश हजारे एस.इ.टी परीक्षेत उत्तीर्ण...

## शासकीय अध्यापक महाविद्यालय यांच्या कडून कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव...

**जनसंचलन/बुलढाणा**

शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलढाणा येथील अंतिम वर्षाच्या बि. एड प्रशिक्षणार्थी दीक्षा रामकृष्ण जाधव मराठी या विषयात एन.इ.टी परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत . आणि महाविद्यालयाचे प्रशिक्षणार्थी महेश चंद्रकांत हजारे एस.इ.टी ही परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या यु.जी.सी - एन.इ.टी / एस.इ.टी या महत्वपूर्ण परीक्षेत मराठी या विषयात दोन्ही बि.एड प्रशिक्षणार्थी उत्तीर्ण झाले असून सदर ही परीक्षा गुणवत्तापूर्ण प्राध्यापक बनण्यासाठी घेतली जाते. कु. दीक्षा जाधव व महेश हजारे यांनी मराठी या विषयात सहाय्यक प्राध्यापक या पदा करिता प्राविण्य संपादन केले असून शासकीय अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सीमा सुरेश लिंगायत व सर्व प्राध्यापक वृंद यांच्या कडून अभिनंदन केल्या गेले तथा सर्व बि.एड प्रशिक्षणार्थी यांच्या कडून कौतूक केल्या जात आहे.





# नवमतदारांनी मतदार नोंदणीसाठी पुढाकार घ्यावा- जिल्हाधिकारी किरण पाटील

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा राज्यात लोकसभा आणि विधानसभेसाठी निवडणूक होणार आहे. यासाठी नवमतदारांनी पुढाकार घेऊन मतदार नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. नुकत्याच झालेल्या मतदार याद्यांच्या अद्ययावतीकरणामध्ये नवमतदारांनी नोंदणीसाठी सहभाग नोंदवला आहे. त्यामुळे नवमतदारांच्या नोंदणीत लक्षणीय वाढ झाली आहे. तहसिल आणि मंडळस्तरावर प्रत्येक बुधवारी मतदार नोंदणीसाठी विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे, तसेच विविध जनजागृतीपर उपक्रम राबवून मतदारयादीमध्ये पात्र मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे. गेल्या पुनरीक्षण कार्यक्रमात दि.१ ऑक्टोबर २०२४ या तारखेस १८ वर्षे पुर्ण करणाऱ्या युवकांना पूर्व नोंदणी करता आली. ही प्रक्रिया अद्यापही सुरू असल्याने युवकांनी नाव नोंदणी करावी. मतदारयादीत नाव नसलेल्या नागरिकांनी नमुना ६ भरून आपला मताधिकार सुनिश्चित करावा, तसेच सर्व राजकीय पक्षांनीही पक्षामार्फत मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींच्या नियुक्त्या करून त्यांच्या माध्यमातून मतदारांना यादीत नाव तपासण्यास आणि नावे नसलेल्यांना मतदार नोंदणीस साहाय्य करावे. नागरिकांना मतदार नोदणी कार्यालयात प्रत्यक्ष मतदार नोंदणी करता येणार



आहे, तसेच मतदाता सेवा पोर्टल आणि वोटर हेल्पलाइन ॲपवर ऑनलाइन नाव नोंदणीची सुविधा सुद्धा उपलब्ध आहे. अंतिम मतदार यादीमध्ये मतदारांनी आपले नाव समाविष्ट असल्याची खात्री करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

# उद्धव ठाकरेंची तोफ धडाडली; केसरकरांवर टीकास्त्र, म्हणाले- खुर्ची मिळाली परंतु गद्दारीचा डाग पुसला जाणार नाही...

वृत्तसंस्था/सिंधुदुर्ग

जिल्ह्यात उद्धव ठाकरे यांचं सावंतवाडी येथे जंगी स्वागत करण्यात आले. त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी मंत्री दीपक केसरकर यांच्यावर जोरदार निशाणा साधला. काही तरी करतील म्हणून दीपक केसरकर यांना मोठ्या अपेक्षेने मी शिवसेनेत घेतले. त्यांना मंत्रिपद दिले परंतु ते डबल गद्दार निघाले. आज ते सत्तेत असतील खुर्चीची उब त्यांना मिळेल. परंतु त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांना लागलेला गद्दारीचा डाग कधीही पुसला जाणार नाही. ते इमानदार होऊच शकत नाहीत, असा आरोप आज येथे आयोजित सभेत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला.

ते म्हणाले की, येणाऱ्या निवडणुकीत सावंतवाडीत पंतप्रधान मोदींचा झाडू घेऊन सुपडा साफ करायचा आहे. गद्दारी करणाऱ्यांना धडा शिकवायचा आहे. त्यामुळे तुम्ही माझ्यासोबत आहात ना, अशी भावनिक साद त्यांनी यावेळी उपस्थित शिवसैनिकांना घातली. यावेळी उद्धवसाहेब तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. संवाद यात्रेच्या निमित्ताने शिवसेना पक्षप्रमुख ठाकरे यांनी सावंतवाडीतून आपल्या दौऱ्याला सुरुवात केली आहे. यावेळी गांधी चौकात आयोजित करण्यात आलेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी खासदार विनायक राऊत, आमदार वैभव नाईक, सिंधुदुर्ग संपर्कप्रमुख अरुण दुधवडकर, शिवसेना नेते भास्कर जाधव, गौरीशंकर खोत, सतिश सावंत, संदेश पारकर, जिल्हाप्रमुख संजय पडते, तालुकाप्रमुख रुपेश राऊळ, बाबुराव धुरी, मंदार शिरसाट, अतुल रावराणे मायकल डिझोजा रुची राऊत, आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी ठाकरे यांनी उपस्थितांना भावनिक साद घातली.उद्धव ठाकरे म्हणाले की, आगामी काळात होणाऱ्या निवडणुकांसाठी मी पुन्हा येईनच. परंतु आज जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेशी संवाद साधण्यासाठी मी या ठिकाणी आलो आहे. या ठिकाणी मी मन की बात नाही तर दिल की बात ऐकवणार आहे. मनात काळे कपट असू शकते, पण हृदयात नाही. त्यामुळे आपण त्या पद्धतीने शिवसैनिकांशी संपर्क साधणार आहे. त्यामुळे एक कुटुंबप्रमुख म्हणून मी तुमच्यात आलो आहे. यावेळी त्यांनी मंत्री केसरकर यांच्यावर नाव न घेता भोचरी टीका केली. ते म्हणाले, ते डबल गद्दार आहेत. एक चांगला माणूस आणि आठवड्यातून पंधरावड्यातून शिर्डीला जात असल्यानेच एक चांगला माणूस म्हणून मी त्यांना पक्षात घेण्याचा निर्णय घेतला. ते चांगले काम करतील असे वाटले म्हणून त्यांना मंत्रिपद दिले. परंतु त्यांच्याकडे श्रद्धाही नाही आणि सबुरी नाही. त्यांनी आजपर्यंत एकाही पक्षावर श्रद्धा दाखवली नाही. आपल्याला काहीतरी मिळेल यासाठी सबुरी बाळगली नाही.ते म्हणाले की, भास्कर जाधव यांच्या सांगण्यानुसार ते तांदूळ वगैरे काहीतरी करतात. परंतु आपला त्यांच्यावर विश्वास नाही. आपल्या स्वार्थासाठी ते इकडे तिकडे उड्या मारत आहेत. परंतु त्यांना आज सत्ता मिळाली असेल खुर्चीची उब मिळाली असेल. परंतु त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांवर असलेला बेईमानीचा डाग पुसला जाणार नाही. त्याचबरोबर केसरकर हे कोणाचेही होऊ शकत नाहीत. ते गद्दारच आहेत. कसं आहे बरं आहे याच्या पलीकडे ते काही करू शकत नाहीत, असाही टोला त्यांनी लगावला. आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीत या ठिकाणी पुन्हा एकदा त्यांचा सुपडा साफ करायचा आहे. त्यामुळे कामाला लागा, असे आवाहन करत कुडाळ मतदारसंघात वैभव नाईक यांनी तर लोकसभा मतदारसंघात विनायक राऊत यांनी चांगली कामगिरी करून दुष्ट शक्तींना बाजूला ठेवण्याचे काम केले आहे. तसेच काम येथे करून शिवसैनिकांनी बेईमानांना जागा दाखवावी, असं वक्तव्य ठाकरे यांनी केले आहे.




# चिखलीत दरोडेखोरांचा हैदोस; पती, पत्नीस केली मारहाण!

## दोघे गंभीर : आरडाओरड केल्याने दरोडेखोर पळाले!

जनसंचलन/ चिखली

शहरातील गजानन नगरपरिसरातील एका घरात २ फेब्रुवारीच्या रात्री दीड वाजेच्या सुमारास दरोडेखोरांनी हैदोस घातला. दरोड्याच्या तयारीत असलेल्या दरोडेखोरांनी घराच्या मागील बाजूने असलेला दरवाजा तोडून घरात प्रवेश केला होता. दरोडेखोरांच्या मारहाणीदरम्यान आरडाओरड केल्याने दरोडेखोर पळाले असून दरोडेखोरांच्या मारहाणीत पती- पत्नी गंभीर जखमी झाले आहेत. स्थानिक गजानन नगर येथे वास्तव्यास असलेले गजानन नवले यांच्या घरावर रात्री दीड-पावनेदोनच्या सुमारास दरोडेखोरांनी घराचा मागचा दरवाजा लोखंडी टॉमीच्या सहाय्याने फोडून घरात प्रवेश केला. घरात झोपलेल्या गजानन नवले आणि त्यांच्या पत्नी अलका नवले यांना दरडावत सोने कुठे, पैसे कुठे याची विचारणा करून लोखंडी रॉडने अलका नवले यांच्या हातावर, डोक्यावर मारत गंभीर जखमी केले, प्रतिकार करण्यासाठी गेलेल्या गजानन नवले यांना देखील बेदम मारहाण केल्याने ते भोवळ येऊन पडले. दरम्यान, गंभीर जखमी अवस्थेतही अलका नवले यांनी जोरात आरडाओरड केल्याने समोरच्या खोलीत झोपलेले गजानन नवले यांचे भाऊ पप्पू नवले यांना जाग आली आणि ते मदतीसाठी धावले. या दरम्यान दरोडेखोर पसार झाले. याप्रकरणी केशव सीताराम नवले यांच्या फिर्यादीवरून २५ ते ३० वयोगटातील सडपातळ व उंच शरीरयष्टी असलेल्या अज्ञात दोन व्यक्तींनी जबरी चोरी करण्याच्या उद्देशाने घरात प्रवेश करून गजानन नवले व अलका नवले यांना मारहाण करून गंभीर जखमी केल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पीएसआय नितीनसिंग चौहान करीत आहेत. दरम्यान, भरवस्तीत घडलेल्या या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली आहे. दरम्यान या दरोड्यात नेमका किती माल गेला ही बाब अद्याप स्पष्ट झालेली नाही. दोन्ही जखमींवर रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे. दुसरीकडे या घटनेमुळे चिखली शहर परिसरात नागरिकांमध्ये धास्ती बसल्याचे चित्र आहे.

# उपशिक्षणाधिकारी देवकर यांची महात्मा फुले शाळेस भेट

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमाचा घेतला आढावा



जनसंचलन/बुलढाणा

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमाअंतर्गत महात्मा फुले शाळा बुलडाणा येथे उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर आणि प्रोजेक्ट लेट्स चेंज जिल्हा समन्वयक तथा सहायक कार्यक्रम अधिकारी मंगेश भोरसे यांनी आज ३ फेब्रुवारी २०२४ रोजी भेट दिली. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमाअंतर्गत उपशिक्षणाधिकारी यांनी आकस्मिक विद्यालयाला भेट दिली. विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची रितसर माहिती घेतली. त्यामध्ये परसबाग, वसुधैव कुटुंबकम विद्यार्थ्यांनी तयार केलेले भित्तीचित्रे, शाळेतील सुविचार, विद्यार्थ्यांनी तयार केलेले प्रकल्प, विद्यार्थ्यांनी राबविलेले वृक्षारोपण, मेरी माटी मेरा देश, विद्यार्थी संसद, स्वच्छता मॉनिटर्स, विद्यार्थ्यांचा खेळातील सहभाग शाळेतील तुळसबाग, ड्रेनेज सिस्टीम, अशा सर्व प्रकारच्या चालणाऱ्या प्रक्रियांची माहिती देवकर आणि मंगेश भोरसे यांनी घेतली. महात्मा फुले विद्यालय बुलढाणा येथे उपशिक्षणाधिकारी यांनी पहिल्यांदा भेट दिली. या निमित्ताने विद्यालयाचे मुख्याध्यापक लता मानकर यांनी देवकर आणि मंगेश भोरसे, जिल्हा समन्वयक प्रोजेक्ट लेट्स चेंज यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.या सत्कार सोहळ्याला विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# कोळी समाज संघाचे तालुकाध्यक्ष प्रकाश शेळके यांनी केले अनोखे आंदोलन

जनसंचलन/ चिखली

कोळी समाज बांधवांना अनु.जमातीचे जातीचे दाखले देण्यात यावे या मागणीसाठी बुलडाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर समाजबांधवांनी आमरण उपोषण सुरु केले असून या उपोषणाला संपूर्ण बुलडाणा जिल्ह्यातून कोळी समाजबांधवांनी पाठींबा दिला आहे. त्याचाच एक भाग म्हणून चिखली तालुक्यातील भोकर येथील महाराष्ट्र कोळी समाज संघाचे चिखली तालुकाध्यक्ष प्रकाश शेळके यांनी २ फेब्रुवारी रोजी स्वत:ला जमिनीत गाडून घेवून अनोखे आंदोलन केले. गेल्या अनेक वर्षापासून बुलडाणा जिल्ह्यातील कोळी समाजबांधवांना अनु.जमातीचे जात प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे त्यांचा हक्क हिरावून घेतला जात असून बुलडाणा येथे सुरु असलेल्या समाज बांधवांच्या उपोषणाला पाठींबा दर्शवित हे आंदोलन करण्यात आले.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958